# प्रेस नोट

## गुन्हे आढावा बैठक

मा.विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ.सुहास वारके, यांचे मार्गदर्शनाखाली कॉन्फरन्स हॉल पोलीस अधिक्षक कार्यालय कोल्हापूर येथे मासिक गुन्हे आढावा बैठक पार पडली. सदर बैठकीस मा. पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख, अपर पोलीस अधिक्षक तिरुपती काकडे, अपर पोलीस अधिक्षक गडहिंग्लज विभाग श्रीनिवास घाडगे, उपविभागीय पोलीस अधिकारी व सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी उपस्थित होते. पोलीस ठाणे स्तरावरील प्रलंबित गुन्हे, प्रतिबंधात्मक कार्यवाही तसेच ईद-ए-मिलाद च्या अनुषंगाने आढावा घेतला.

संपूर्ण महिन्यामध्ये उत्कृष्ठ कामगिरी करणाऱ्या पोलीस ठाण्यास पोलीस स्टेशन ऑफ दि मन्थ हा पुरस्कार प्रशस्तीपत्र व रोख रक्कम स्वरुपात देण्यात येतो तो पुरस्कार ऑगस्ट व सप्टेंबर महिन्याकरीता पोलीस निरीक्षक प्रमोद जाधव, जुना राजवाडा व सहा.पोलीस निरीक्षक, श्रीमती विद्या जाधव, ईस्पूर्ली पोलीस ठाणे यांना देण्यात आला. उघडकीस न आलेले गुन्हयांची उकल करणा-यास ''विशेष पुरस्कार'' देण्यात येतो तो पुरस्कार स्थानिक गुन्हे शाखेकडील पोलीस कर्मचारी राजेश आनंदराव आडुळकर पो.हे.कॉ.१५०१, रामचंद्र शामराव कोळी पो.ना.१३९९, सायबर पो.ठाणेकडील अमित उत्तमराव सर्जे पो.ना.१००७ , करवीर पो.ठाणेकडील प्रशांत सदाशिव माने पो.हे.कॉ.५७०, युक्ती राजेंद्र ठोंबरे पो.कॉ. २३५२ यांना गोकुळ शिरगांव पोलीस ठाणे येथे गु.र.न.२७/२०१९ भादवि कलम ३०२,३९७, करवीर पोलीस ठाणेकडील गु.र.नं.५०३/२०१९ भा.द.वि.कलम ३९७,४५७,३४ व शिरोली एमआयडीसी पो.ठाणे गु.र.नं. २२६/२०१६ भा.द.वि.कलम ४५७,३८० हे गुन्हे उघडकीस आणल्यामुळे देण्यात आला तर

गोपनीय माहिती व्दारे उघडकीस न आलेले गुन्हयांची उकल करणा-यास '' बहींजी नाईक'' हा पुरस्कार देण्यात येतो तो पुरस्कार तुकाराम दत्तात्रय राजीगरे पो.ना.९७०, आसिफ महंमद कलायगार पो.कॉ.१४५० व इकबाल गुलाब महात पो.हे.कॉ.२११ यांना त्यांनी रेकॉर्डवरील गुन्हेगार शुभंम शातांराम शिंदे रा.अर्जुनवाडी ता.गडहिंग्लज जि.कोल्हापूर हा बेकायदेशीर अग्निशस्त्रे जवळ बाळगुन विक्री करतो अशी माहिती मिळवून दि.१०/०९/२०१९ रोजी आरोपी शुभंम शातांराम शिंदे व अदिनाथ तुकाराम बडेकर रा.बीड खुर्द पो.जाबरुगं ता.खालापूर जि.रायगड या दोघांना कोल्हापूर ते कागल जाणारे हायवे रोडलगत कणेरी फाटा या ठिकाणी पकडून त्यांचेकज्बातील ४ गावठी बनावटीचे पिस्टल ,७ राउंड व इतर साहीत्य असा मुदद्‌माल जप्त करुन त्यांचे विरुध्द गोकुळ शिरगांव पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल केला. सदर गुन्हयाचा स्थानिक गुन्हे शाखेकडून तपास करुन सदर गुन्हयाचे तपासात वर आरोपीत यांचा साथीदार शर्मेश रोहिदास राठोड रा.कामोठे, नवी मुंबई यास अटक केली, त्याचेकडून २

गावठी बनावटीचे पिस्टल व ४ रांऊड जप्त करुन तपासात एकूण ३,११,३१०/- रुपये किंमतीच्या ६ पिस्टल व ११ राउंड असा मुदद्‌माल जप्त केला करीता देण्यात आला.

तर "सप्टेंबर २०१९ चा बेस्ट डिटेक्शन" पुरस्कार जोतीबा डोंगराचे आसपासचे परीसरात मोटर सायकलवरुन जाणारे स्त्री पुरुषांना निर्जन स्थळी आडवून त्यांना चाकूचा धाक दाखवून व वेळप्रसंगी मारहाण करुन दागिन्यासह किंमती ऐवज काढुन घेणाऱ्या टोळीस जेरबंद करणाऱ्या टोळीस पकडणारे श्री.तानाजी सावंत, पोलीस निरीक्षक , स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, कोल्हापूर, श्री.संतोष पवार,सहा.पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, कोल्हापूर, श्री.राजेश आनंदराव आडुळकर पो.हे.कॉ.१५०१ स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, कोल्हापूर, श्री.सचिन सुर्याजी पाटील पो.हे.कॉ.१४२७ स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, कोल्हापूर,श्री.सुरेश सदाशिव पाटील पो.कॉ.१३६० स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, कोल्हापूर, श्री रविंद्र कृष्णात कांबळे पो.कॉ.४९१ स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, कोल्हापूर, श्री.अमर बजरंग वासुदेव पो.ना.१३१२ सायबर पोलीस ठाणे, श्री.हिदुंराव रामचंद्र केसरे पो.ना.१४१५ कोडोली पोलीस ठाणे व माहे ऑक्टोंबर २०१९ करीताचा "बेस्ट डिटेक्शन" पुरस्कार करवीर तसेच इतर पोलीस ठाणे हद्दीत घरपोडी करणारी टोळी पकडून त्यांचेकडुन एकुन ११ घरफोड्या उघडकीस आणुन एकुण ५,९२,७००/- रुपये किमतीचा मुददेमाल हस्तगत केला करीता करवीर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुनिल पाटील,पोलीस उपनिरीक्षक विवेकानंद राळेभात, पोहवा प्रशातं माने, राजु जरळी, पोना दिपक घोरपडे, गुरुप्रसाद झांबरे, सुहास पाटील, पोकॉ युक्ती ठोंबरे, पोकॉ रामचंद्र माळी व पोकॉ सचिन बेंडखळे यांना देण्यात आला.

"सर्वोत्कृष्ट दोष सिध्दीचा" पुरस्कार सहा.पोलीस निरीक्षक श्रीमती सरोजनी चव्हाण, यांना राजारामपूरी पोलीस ठाणेच्या गु.र.नं.२६८/२०१७ मध्ये बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण च्या गुन्हयात योग्य रितीने तपास करुन आरोपीस अजन्म कारावास व र.रु.१,००,०००/- इतका द्रव्यदंडाची शिक्षा लागली असल्याने देण्यात आला. सर्व पुरस्कार मा.पोलीस अधिक्षक डॉ.अभिनव देशमुख, कोल्हापूर यांच्या संकल्पनेतून देण्यात आले आहेत.

******